ALPARAMBHA

## अल्पारंभ फाऊंडेशन मार्फत घेतलेले सांस्कृतिक उपक्रम

- **मे २०२६:** पवार तबला अकादमी आयोजित आणि अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन प्रस्तुत "तालाभिषेक बैठक" हा शास्त्रीय संगीताचा सुंदर कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. पुण्याचे युवा तबलावादक ईशान परांजपे यांच्या प्रभावी तबलावादनाने आणि नाशिकचे सुप्रसिद्ध गायक डॉ. आशिष रानडे यांच्या सुरेल गायनाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले.




- **मार्च २०२६ :** गुढीपाडव्यानिमित्त (गुरुवार दि. १९ मार्च २०२६) 'गीतरामायण- एक स्वर नृत्य अविष्कार' या अप्रतिम कार्यक्रमाचे आयोजन.



- **मार्च २०२६ :** संगीत आणि सामाजिक कार्याचा सुंदर संगम – ANHAD FEST २०२६ ✨ 🎶




- **तबलाचिल्ला २०२६ —** जिथे ताल म्हणजे प्रार्थना आणि संगीत म्हणजे साधना. महान तबलावादक उस्ताद अहमद जान थिरकवा यांच्या स्मृतींना समर्पित हा उत्सव, भारतीय शास्त्रीय संगीतातील आध्यात्मिक परंपरेचा गौरव करणारा एक भावपूर्ण प्रवास !




- **जानेवारी २०२६:** पवार तबला अकॅडमी व अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तालाभिषेक बैठक (१०वी) चे आयोजन




- **डिसेम्बर २०२५:** "तालाभिषेक पं. भानुदासजी पवार स्मृती संगीत समारंभ (२०२५)". शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. आपण आवर्जून उपस्थित राहावे, सस्नेह आमंत्रण !!




- **३ ऑगस्ट २०२५:** "स्वरतीर्थ" – एक अद्वितीय संगीतमय संध्या. अल्पारंभ एज्युकेशनल ॲण्ड कल्चरल फाऊंडेशन आयोजित सुप्रसिद्ध संगीतकार व गायक सुधीर फडके यांची अजरामर गाणी . V.K. म्युझिकल्स प्रस्तुत "स्वरतीर्थ". गायक: श्री. विवेक केळकर आणि सौ. मं. दिवाण



- **१९ जुलै २०२५ :** गुरुपौर्णिमे निमित्त, अल्पारंभ फाऊंडेशन आणि संस्कार भारती यांचे वतीने नाशिकचे प्रसिद्ध गायक पं. डॉ. अविराज तायडे आणि पं. श्री. प्रसाद खापर्डे आणि इतर अनेक यशस्वी शिष्यगण यांचे गुरु, घाटंजी येथील पण्डित देवरावजी भालेराव गुरुजी, यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. पंडित भालेराव गुरुजींचा सन्मान पत्र देऊन गौरव करण्यात आला. हा सुमधुर कार्यक्रम भक्ती गीत सादरीकरणाने उत्तरोत्तर रंगत गेला.



- **मे २०२५ :** पवार तबला अकादमी आणि अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाऊंडेशन या दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने तालाभिषेक बैठक ९ चे आयोजन दिनांक १० व ११ मे २०२५ रोजी विशाखा हॉल कुसुमाग्रज स्मारक,गंगापूर रोड नाशिक येथे करण्यात आले होते. दि. १० मे रोजी डॉ.अलका देव मारुलकर यांचे शास्त्रीय गायन सादर झाले. तसेच त्यांची प्रकट मुलाखत ज्येष्ठ संवादक वंदना अत्रे यांनी घेतली. दि. ११ मे रोजी डॉ.अलका देव मारुलकर यांच्या हस्ते पं.अविराज तायडे यांचा षष्ठब्दीपूर्ती निमित्ताने सत्कार करण्यात आला. तसेच श्री. अद्वय पवार यांचे एकल तबला वादन व श्री. ज्ञानेश्वर कासार यांचे गायन सादर झाले.




**एप्रिल २०२५:** दिनांक १ एप्रिल २०२५,सायंकाळी ५.३० वा. कालिदास कलामंदिर, नाशिक येथे अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाऊंडेशन, नासिक च्या विद्यमाने "गीत रामायण: श्री. विवेक केळकर" , या सुरेल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




**मार्च २०२५:** पवार तबला अकादमी आणि अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन, नासिक यांच्या संयुक्त विद्यमाने 'तालाभिषेक बैठक ८' चे आयोजन !




**फ्रेबुवारी २०२५:** आदिताल तबला अकादमी आणि अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाऊंडेशन, नासिक यांच्या संयुक्त विद्यमाने "तबला चिल्ला २०२५' चे आयोजन ७ ते ९ फ्रेब्रुवारी २०२५ या कालावधीत विशाखा हॉल कुसुमाग्रज स्मारक,गंगापूर रोड नाशिक येथे करण्यात आले होते.







**जानेवारी २०२५:** कलाश्री संगीत गुरुकुल आणि अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाऊंडेशन नाशिक, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "स्वरभास्कर : गायन स्पर्धा २०२५" (छोटा ख्याल, मराठी अभंग/भक्तीगीत स्पर्धा). ही स्पर्धा ३ वेगवेगळ्या वयोगटात आयोजित केली गेली.




**डिसेम्बर २०२४:** पं.भानुदास पवार स्मृती संगीत समारोह (वर्ष २७वे) या निमित्ताने, पवार तबला अकॅडेमी आणि अल्पारंभ फौंडेशन नाशिक, यांच्या संयुक्त विद्यमाने  तालयोगी, पं. सुरेशदादा तळवलकर यांची प्रकट मुलाखत आणि शिष्यांचे तबला सहवादन असा अनोखा कार्यक्रम   शनिवार दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी, शंकराचार्य सभागृह,गंगापूर रोड, नाशिक येथे संपन्न झाला. पं. सुरेशदादांचा  संगीतमय  प्रवास आणि मार्गदर्शन करणारे अनुभव अशी  दुर्मिळ संधी या निमित्ताने नाशिककरांना मिळाली !!




**ऑक्टोबर २०२४:** भारतीय संगीतकार, गायक, पद्मभूषण  स्व. जगजीत सिंग यांचा १० ऑक्टोबर हा स्मरणदिवस ! या दिवसाचे औचित्य साधून अल्पारंभ फौंडेशनमार्फत  रविवार ५ ऑक्टोबर २०२४  रोजी  "शाम ए गझल" या सांगीतिक मैफिलीचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी  श्री.  धनंजय मनोहर , यांनी आपल्या सहकलाकारांच्या समवेत बहारदार गझल सादरीकरण केले. त्यांना  नाशिकचे प्रतिथयश कलाकार श्री. राजेश भालेराव , श्री. रसिक कुलकर्णी, रागेश्री धुमाळ तसेच श्री. ऋषिकेश क्षीरसागर यांनी समर्पक साथसंगत केली. स्व. जगजीत यांनी गायलेल्या तसेच संगीतबद्ध केलेल्या अनेक बहारदार गझलींची प्रस्तुती यावेळी करण्यात आली.





**सप्टेंबर २०२४:** शनिवार २९ सप्टेंबर रोजी  पवार तबला अकादमी आणि अल्पारंभ  एज्युकेशनल अँड  कल्चरल फाऊंडेशन आयोजित  "तालाभिषेक बैठक: ७" , कुसुमाग्रज स्मारक ,विशाखा सभागृहात संपन्न !!






## तालाभिषेक मैफिलीत रसिकांनी घेतला श्रवणानंद

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

युवा तबलावादक रोहित श्रीवंत यांचे स्वतंत्र तबलावादन आणि कोलकाता येथील किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक उस्ताद मशकूर अली खाँ यांचे गायन अशा दुहेरी संयोगाने रविवारची सायंकाळ नाशिककर रसिकांना श्रवणानंद देऊन गेली.

पवार तबला अकादमी आणि अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने व कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या सहकार्याने 'तालाभिषेक बैठकी' अंतर्गत कुसुमाग्रज सरकात सातव्या संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विश्वास पांगारकर, संदीप देशमुख, महाराष्ट्र सेवा संघाचे सहसचिव पंकज पवार, डॉ. अविराज तायडे, प्रा. नितीन पवार, रघुवीर अधिकारी उपस्थित होते. स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. अविराज तायडे यांनी केले.

पंकज चांडोले

मैफिलीत गायन वादनात रंगलेले कलाकार

मैफिलीच्या पूर्वार्धात तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांचे शिष्य रोहित श्रीवंत यांचे स्वतंत्र तबलावादन झाले. त्यांनी रूपक तालात परंपरेनुसार उठाण, पेशकार, कायदे, रेले, चलन, गत, तुकडे, तिहाया व चक्रदार यांचे सादरीकरण केले. त्यांना ईश्वरी दसककर यांनी संवादिनीची साथ केली. उत्तरार्धात मशकूर अली खाँ यांचे गायन झाले.

**जून २०२४:** गुरु पद्मभूषण उस्ताद राशीद खान यांना शिष्यांकडून आदरांजली आणि अभिवादन ! "स्वर सुमनांजली" या दोन दिवसीय सांगीतिक कार्यक्रमाचे सादरीकरण !






**मे २०२४ :** पद्मश्री तालयोगी पं. सुरेशदादा तळवलकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा २८ मे २०२४ रोजी गुरुदक्षिणा सभागृह नासिक येथे संपन्न झाला. त्यांचा सत्कार सुपर कॉम्प्युटरचे जनक पद्मभूषण डॉ विजय भटकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी श्री. सत्यजित तळवलकर यांचे एकल तबलावादनही सादर झाले.









## 'तबला चिल्ला..अखंड नादसंकीर्तन'

आदिताल तबला अकादमीच्या सहकार्याने विद्यमाने नाशिकमध्ये 'तबला चिल्ला..अखंड नादसंकीर्तन' ही संकल्पना सुरू झाली नाशिकमधील तबला चिल्ला ही साधना म्हणजे राज्यातीलच नव्हे तर राज्याबाहेरील साधकांसाठीही एक तालपर्वणीच असते.

यातील काही क्षणचित्रे पुढीलप्रमाणे:

**वर्ष २०२४ : २३-२५ फेब्रुवारी २०२४: तबला चिल्ला महोत्सव वर्ष ८ !!**






सर्व तरुण , होतकरू तब्बल वादक "तबला चिल्ला" या कार्यक्रमास हजेरी लावतात आणि एकाग्रतेने ऐकतात....भविष्य खरोखर उज्ज्वल दिसते..



## वर्ष २०२३: २४ ते २६ फेब्रुवारी २०२३: तबला चिल्ला महोत्सव वर्ष ७ !!






२०२३ ! तबला चिल्ला महोत्सव वर्ष ७ !! भारताच्या विविध भागातील २२ तबला वादकांचे तबला एकल वादन ! कोणत्याही कलाकाराकडून मोबदला किंवा कोणत्याही प्रकारच्या प्रवास भाड्याची अपेक्षाही नसते. सभागृह प्रेक्षकांनी पूर्ण भरून जाते. अप्रतिम अनुभव !

## तालाभिषेक

नाशिक महानगरातील संगीत क्षेत्रात संगीताचा प्रसार आणि शैक्षणिक कार्य करणाऱ्या 'पवार तबला अकादमी'च्या सहकार्याने 'तालाभिषेक' या संगीत महोत्सवाचे आयोजन केले जाते. जानेवारी 2023 पासून 'तालाभिषेक बैठक' या संगीत मैफिलीचे आयोजन देखील केले जात आहे. दर दोन महिन्यांतून एकदा असे या बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे. यामुळे नवोदित तसेच प्रथितयश गायक व वादकांची कला जवळून अनुभवण्याची संधी संगीत रसिकांना मिळत आहे.

### तालाभिषेक २०२४:



अकादमी
फाऊंडेशन
आयोजित
प्रस्तुत
॥तालाभिषेक॥
बैठक
ईश्वरी दसककर
(संवादिनी साथ)
सुजित काळे
(स्वतंत्र तबला वादन)
अभिषेक प्रभू
(शास्त्रीय गिटार)
अद्वय पवार
(तबला साथ)
निवेदन: भास भामरे | ध्वनी: सचिन तिडके | छायाचित्र: अनिकेत कोटे
रविवार, दि. ४ फेब्रुवारी २०२४ | संध्या. ०६:०० वा.
स्वगत हॉल, कुसुमाग्रज स्मारक, गंगापूर रोड, नाशिक


## तालाभिषेक २०२३:



पवार तबला अकादमी
आयोजित
अल्पारंभ एज्युकेशनल ॲन्ड कल्चरल फाऊंडेशन
ALPARAMBHA
प्रस्तुत
॥तालाभिषेक॥
बैठक
गायन
सानिका कुलकर्णी
(पुणे)
एकल तबला वादन
कल्याण पांडे
साथसंगत: कुणाल काळे | पुष्कराज भागवत | ईश्वरी दसककर
निवेदन: मंगेश जोशी | ध्वनी: सचिन तिडके | छायाचित्र: अनिकेत मोटे
रविवार, दि.०९ जुलै २०२३ | संध्या. ०६:०० वा. | स्वगत हॉल, कुसुमाग्रज स्मारक, गंगापूर रोड, नाशिक
सौजन्य
SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services
प्रवेश विनामूल्य
सहकार्य
कुसुमाग्रज स्मारक
Srujan

**९ जुलै २०२३ , तालाभिषेक बैठक ४ !** पुनः एकदा अप्रतिम ताल-सुरांची बरसात ! गायन : सानिका कुलकर्णी, हार्मोनियम : ईश्वरी दसककर तबला: कुणाल काळे.

क्षणचित्रे ..

https://fb.watch/lLY3xHXktR/?mibextid=Nif5oz












epaper.lokmat.com
नाशिक, सोमवार, दि. १५ मे २०२३ 3

## गायन-वादनाने रंगली तालाभिषेक बैठक

### उपस्थितांची वाहवा : तिसऱ्या संगीत मैफलीचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : येथील आरोह ओक यांच्या बहारदार गायनासह मुंबईच्या स्वप्नील भिसे यांचे तबलावादन रंगत गेले. दोघांच्याही सादरीकरणाला रसिकांनी भरभरून दाद दिली. पवार तबला अकादमी आणि अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन या दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने व कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या सहकार्याने 'तालाभिषेक बैठक'अंतर्गत तिसऱ्या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात प्रारंभी दीपप्रज्वलन संगीततज्ज्ञ डॉ. संजीव शेलार, निरंजन सोनवणे, सपना खैरनार, संजीवनी देसाई, डॉ. अविराज तायडे, प्रा. नितीन पवार, रघुवीर अधिकारी यांच्या हस्ते झाले. स्वागत डॉ. अविराज तायडे यांनी, तर प्रास्ताविक रघुवीर अधिकारी यांनी केले. याप्रसंगी मराठवाडा संगीत अकादमी, लातूर या संस्थेतर्फे रघुवीर अधिकारी आणि मनीषा अधिकारी यांना अभिजात संगीत कलेचा प्रचार व प्रसारासाठी उल्लेखनीय योगदान दिल्यामुळे 'संगीत रसिकाग्रणी' पुरस्कार मिळाल्याबद्दल पवार तबला अकादमीतर्फे त्यांचा विशेष सत्कार संचालक नितीन पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

या मैफलीत पूर्वार्धात मुंबईचे युवा तबलावादक स्वप्नील भिसे यांचे एकल तबलावादन झाले. यात त्यांनी ताल तीन तालात पेशकार, विविध कायदे, रेले, चलन, गती, तुकडे, चक्रदार आणि पंजाब घराण्याच्या विविध घराणेदार बंदिशी सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. स्वप्नील भिसे यांना प्रशांत महाबळ यांनी संवादिनी साथ केली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात नाशिकचे युवा गायक आरोह ओक यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी गायनाची सुरुवात मारवा रागातील एकतालात निबद्ध असलेल्या 'बीत गयी मोरी रैना' या बडा ख्यालाच्या बंदिशीने केली. त्यानंतर याच रागातील प्रसिद्ध अशी 'हो गुणीजन मिल' ही द्रुत एकतालातील बंदिश सादर केली. यानंतर तिलक कामोद रागातील 'तिरथ सब करे' ही झपतालातील बंदिश सादर केली. याच रागातील द्रुत एक तालातील तराणा 'तनोम तनन तनोम तनन' याने मैफलीची सांगता केली. त्यांना दिव्या रानडे (संवादिनी) आणि सारंग तत्त्ववादी (तबला) यांनी साथ केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित भालेराव, छायाचित्रण अमित कोटे, महारुद्र आष्टुरकर, तर ध्वनी संयोजन सचिन तिडके यांनी केले.


बैठक
Consultancy & Services
सहकार्य


CORE VALUES
Holistic Growth
Trust